# प्रेसनोट

ला.प्र.वि., जळगाव.
दि. २८/०१/२०२६.

**लोकसेवक नरेश भास्कर शिरूड, तलाठी सजा उत्राण अहिर हद्द, ता. एरंडोल व लोकसेवक शिवाजी एकनाथ घोलप, तलाठी सजा उत्राण गुजर हद्द ता. एरंडोल यांनी ३०,०००/- लाचेची मागणी करून स्वत: स्विकारल्याने त्यांचेविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायदयान्वये कारवाई केलेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | :- | नाशिक/जळगाव |
| **सरकारतर्फे फिर्यादी** | :- | स्मिता दत्तात्रेय नवघरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. जळगांव |
| **पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | :- | कासोदा पोलीस ठाणे गु.र.नं १८/२०२६. |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | :- | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ व १२ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव, वय व कार्यालय** | :- | १) नरेश भास्कर शिरूड, वय ४१ वर्ष, व्यवसाय नोकरी , तलाठी सजा उत्राण अहिर हद्द,ता. एरंडोल जि. जळगांव रा. प्लॉट नं.१३, सर्व्हे नं.१७९, दत्तमंदिरासमोर, वाघ नगर जळगांव **(खाते महसुल विभाग वर्ग-३)**<br>२) शिवाजी एकनाथ घोलप वय ४६ वर्षे व्यवसाय नोकरी तलाठी सजा उत्राण गुजर हद्द ता. एरंडोल रा.रू.नं.०९, पार्थ इलाईट, हरीओम नगर, आर्टीलरी सेंटर रोड, नाशिक रोड, नाशिक, मुळ रा.पहुर पेठ, ता.जामनेर जि. जळगांव **(खाते महसुल विभाग वर्ग-३)** |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | :- | प्रथम २५,०००/- रुपये पडताळणी दरम्यान ३०,०००/- रुपये मागणी करण्यात आली. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :- | ३०,०००/- रुपये |
| **थोडक्यात हकिकत** | :- | प्रस्तुत बातमीतील हकिकत अशी की, यातील तक्रारदार यांचे उत्राण गिरणा नदीपात्रात यातील आलोसे क्र.१ यांनी वाळूचे टॅक्टर भरलेले दिनांक २७/०१/२०२६ रोजी सकाळी पकडलेले होते . सदरचे टॅक्टर नंतर सोडून देण्यात आले होते. सदर वाळूने भरलेले ट्रैक्टर सोडले व कारवाई केली नाही म्हणून आलोसे क्र.१ यांनी टॅक्टर सोडताना २५,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी दि. २७/०१/२०२६ रोजी ला.प्र.वि. जळगाव घटकास तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २७/०१/२०२६ रोजी पंचासमक्ष एरंडोल येथे लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमावली असता यातील आलोसे क्र.१ यांनी तक्रारदार यांचे गिरणा नदीपात्रात वाळूचे भरलेले ट्रक्टर पकडलेले होते. सदरचे टॅक्टर सोडल्याचा मोबदल्यात व कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे ठरल्याप्रमाणे २५,०००/- रुपये बिलकुल घेणार नाही. इतरांकडून जास्त घेतो, तू गरीब आहे म्हणून तुझ्याकडून फक्त ३० हजार रुपये घेतोय अस सांगून ३०,००० रुपये लाचेची मागणी करून आलोसे क्र.२ यांनी तक्रारदार यांना लाच |

| | | |
|---|---|---|
| | | रक्कम देण्यास प्रोत्साहन दिल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले.<br>सदर लाचमागणी पडताळणी कारवाई झाल्यानंतर लागलीच सापळा कारवाई आजमावली असता सदर ग्रामपंचायत कार्यालयाच्या वरती राहत असलेल्या एका रुम मध्ये यातील आलोसे क्र.२ शिवाजी घोलप, तलाठी यांनी आलोसे क्रमांक १ याचे उपस्थितीत ३०,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |
| **जप्त मुद्देमाल** | :- | **सदर सापळा कारवाई दरम्यान आलोसे नरेश भास्कर शिरुड यांचे ताब्यात मिळुन आलेला व जप्त करण्यात आलेला मुद्देमाल :-**<br><br>**१) १,७३,३००/- रुपये रोख रक्कम**<br>**२) २९५०/- रुपये किंमतीची एक Paul John कंपनीची ७५०ml व्हिस्की बॉटल (गिफ्ट रॅपर मध्ये पॅक असलेली)**<br>**३) Oppo कंपनीचा मोबाईल फोन** |
| **सापळा कारवाई** | :- | **पर्यवेक्षण अधिकारी :- श्री.योगेश ठाकूर, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.जळगांव**<br>**सापळा अधिकारी** :- श्रीमती स्मिता नवघरे, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगांव<br>**सापळा पथक** :- पो.नि. हेमंत नागरे, पो अं/प्रदीप पोळ, पो अं/अमोल सुर्यवंशी व पो.अं./सचिन चाटे ला.प्र.वि.जळगांव<br>**तपास अधिकारी** :- श्री. हेमंत नागरे, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगांव |
| **मागदर्शन** | :- | **१) मा. श्री. भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र,नाशिक.<br>३)मा.श्री.सुनील दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.,नाशिक परिक्षेत्र,नाशिक. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगाव.

संकेतस्थळ :– **acbmaharashtra.gov.in**

ई–मेलः– **spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com**

ऑनलाईन तक्रार :– **acbmaharashtra.net**

टोल फ्रि क्रमांक :– **1064**

दुरध्वनी क्रमांक :– **0257-2235477**

व्हॉट्सॲप मोबाईल क्रमांक :– **7588661064**